# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## भूगोल विभाग

प्रभात पुणे, गुरुवार, दि. २७ सप्टेंबर २०१८

# राजगुरूनगरच्या विद्यार्थ्यांची 'भीमाशंकर'ला भेट

## प्रत्यक्ष भेटीतून जाणली वनऔषधी वनस्पतींची माहिती : ४५ जणांचा सहभाग



भीमाशंकर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने परिसरातील वन औषधी वनस्पतींची पाहणी करताना विद्यार्थी.

राजगुरूनगर, दि. २६ (प्रतिनिधी) - हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरातील वन औषधी वनस्पतींची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी; तसेच तालुक्यातील भूरूपे, वसाहती, शेती, जलप्रणाली यांचा प्रत्यक्ष अभ्यास करावा, भौगोलिक संकल्पना आणि प्रत्यक्ष अनुभव या भेटीतून घेता यावा या उद्देशाने खेड तालुक्यातील चास, कमान, डेहणे, कारकुडी, भीमाशंकर आणि कोंढवळ परिसरात क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. या क्षेत्र भेटीत भूगोल विषयाचा विशेष स्तरावर अभ्यास करणारे सुमारे ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

आदिवासी लोक आपल्या आजूबाजूला मुबलक प्रमाणात असणाऱ्या हिरडा, बेहडा, सोनकी, बेडकीचा पाला, जंगली अद्रक, सफेद कुडा, वेल्या करंज, नळकंद, अश्वगंधा, सफेद मुसळी, बारदोला, डाळमाधी इ. औषधी वनस्पतींचा उपयोग आपले आरोग्य टिकवण्यासाठी आणि अगदी स्वस्तात आजार बरे करण्यासाठी कसा करून घेतात याची माहिती विद्यार्थ्यांनी करून घेतली व काही वनस्पतींचे संकलनही केले. या वनस्पतींची माहिती स्थानिक नागरिक सखाराम बांगर, सुरेश दाघवड, गणपत वाजे, सुरेश भोजणे यांनी दिली. याशिवाय या क्षेत्र भेटीत विद्यार्थ्यांनी चासजवळील रांजणखळगे, चासकमान धरण, कळमोडी धरण क्षेत्राला भेट दिली. तसेच कळमोडी धरणाजवळील एकलहरे गावाजवळील पॉलिहाऊसला भेट देऊन येथे विकसित केलेल्या गुलाब फुलांच्या विविध जातींचा अभ्यास केला. सह्याद्री पर्वताच्या घाटमाथ्यावर विविध प्रकारच्या फुलांचे आणि जैवविविधतेचे निरीक्षण केले. भीमाशंकर जवळील कोकण कडा, कोथळगड, आंबेगाव तालुक्यातील घोड नदीवरील कोंढवळ येथील धबधबा, घळई, रांजणखळगे, विविध भू-आकार व खडकांविषयी माहिती जाणून घेतली. या क्षेत्र भेटीचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रो. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. गणेश मोढवे यांनी केले. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी प्रोत्साहन दिले.

पुढारी
पुणे, शुक्रवार
२८ सप्टेंबर २०१८



## राजगुरू महाविद्यालयाची क्षेत्रभेट

**राजगुरुनगर :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरात क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते. या क्षेत्रभेटीत सुमारे ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. चास, कमान, डेहणे, कारकुडी, भीमाशंकर आणि कोंढवळ परिसरात क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भीमाशंकरजवळील कोकण कडा, कोथळागड, आंबेगाव तालुक्यातील घोड नदीवरील कोंढवळ येथील धबधबा, घळई, रांजण खळगे, विविध भू आकार, खडक आणि वनऔषधांविषयी माहिती जाणून घेतली. या क्षेत्रभेटीचे आयोजन भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळुक, प्रा. मच्छिंद्र मुळुक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. गणेश मोढवे यांनी केले. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी प्रोत्साहन दिले.

जनप्रवास ३
शुक्रवार, दि. २८ सप्टेंबर २०१८

## राजगुरु महाविद्यालयाच्यावतीने क्षेत्र भेटीचे आयोजन

राजगुरुनगर । वार्ताहर
येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरातील वनऔषधी वनस्पतींची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी तसेच तालुक्यातील भूरूपे, वसाहती, शेती, जलप्रणाली यांचा प्रत्यक्ष अभ्यास करावा, भौगोलिक संकल्पना आणि प्रत्यक्ष अनुभव या भेटीतून घेता यावा या उद्देशाने खेड तालुक्यातील चास, कमान, डेहणे, कारकुडी, भिमाशंकर आणि कोंढवळ परिसरात क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. या क्षेत्र भेटीत भूगोल विषयाच्या विशेषस्तरावर अभ्यास करणारे सुमारे ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

आदिवासी लोक आपल्या आजूबाजूला मुबलक प्रमाणात असणाऱ्या हिरडा, बेहडा, सोनकी,



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले.

तेरड्याचा पाला, जंगली आर्द्रक, सफेद मुसळी, वेल्या करज, नरक्या, अडुळसा, सफेद मुसळी, कारवी, हडसांधी इ. औषधी वनस्पतींचा उपयोग आपले आरोग्य टिकवण्यासाठी आणि अगदी स्वस्तात आजार बरे करण्यासाठी कसा करून घेतात याची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली व काही वनस्पतींचे संकलनही केले. या वनस्पतींची माहिती स्थानिक नागरिक सखाराम वाघेर, सुरेश दाभाडे, गणपत काळे, सुरेश भोजणे यांनी दिली.

याशिवाय या क्षेत्र भेटीत विद्यार्थ्यांनी चासजवळील रांजणखळगे, चासकमान धरण, कळमोडी धरण क्षेत्राला भेट दिली. तसेच कळमोडी धरणाजवळील एकलहरे गावाजवळील पानिहाडमला भेट देऊन येथे विकसित केलेल्या गुलाब फुलांच्या विविध जातींचा अभ्यास केला. सह्याद्री पर्वताच्या घाटमाथ्यावर विविध प्रकारच्या फुलांचे आणि जैवविविधतेचे निरीक्षण केले. भीमाशंकर जवळील कोकण कडा, कोथळागड, आंबेगाव तालुक्यातील घोड नदीवरील कोंढवळ येथील धबधबा, घळई, रांजणखळगे, विविध भूआकार व खडकांविषयी माहिती जाणून घेतली.

या क्षेत्र भेटीचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळुक, प्रा. मच्छिंद्र मुळुक, प्रा. डी.एम. मारकड, प्रा. गणेश मोढवे यांनी केले. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी प्रोत्साहन दिले.

केसरी पुणे, २ ऑक्टोबर २०१८

# राजगुरु महाविद्यालयाच्यावतीने क्षेत्र भेटीचे आयोजन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील भूगोल विभागाच्यावतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरामधील वनऔषधी वनस्पतींची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी तसेच तालुक्यातील भूरूपे, वसाहती, शेती, जलप्रणाली यांचा प्रत्यक्ष अभ्यास करावा, भौगोलिक संकल्पना आणि प्रत्यक्ष अनुभव या भेटीतून घेता यावा या उद्देशाने खेड तालुक्यातील चास, कमान, डेहणे, कारकुडी आणि कोंढवळ परिसरात क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. या क्षेत्र भेटीत भूगोल विषयाचा विशेषस्तरावर अभ्यास करणारे सुमारे ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

आदिवासी लोक आपल्या आजूबाजूला मुबलक प्रमाणात असणाऱ्या हिरडा, बेहडा, सोनकी, बेडकीचा पाला, जंगली आर्द्रक, सफेद कुडा, वेल्या करज, नळकंद, अश्वगंधा, सफेद मुसळी, बारदोळा, हाडसांधी इ. औषधी वनस्पतींचा उपयोग आपले आरोग्य टिकवण्यासाठी आणि अगदी स्वस्तात आजार बरे करण्यासाठी कसा करून घेतात याची माहिती विद्यार्थ्यांनी करून घेतली व काही वनस्पतींचे संकलनही केले. या वनस्पतींची माहिती स्थानिक नागरिक सखाराम बाणेर, सुरेश दाधवड, गणपत वाजे, सुरेश भोजणे यांनी दिली.

याशिवाय या क्षेत्र भेटीत विद्यार्थ्यांनी चासजवळील रांजनखळगे, चासकमान धरण, कळमोडी धरण क्षेत्राला भेट दिली. तसेच कळमोडी धरणाजवळील एकलहरे गावाजवळील पॉलिहाऊसला भेट देऊन येथे विकसित केलेल्या गुलाब फुलांच्या विविध जातींचा अभ्यास केला. सह्याद्री पर्वताच्या घाटमाथ्यावर विविध प्रकारच्या फुलांचे आणि जैवविविधतेचे निरीक्षण केले.

भीमाशंकर जवळील कोकण कडा, कोथळागड आंबेगाव तालुक्यातील घोड नदीवरील कोंढवळ येथील धबधबा, घळई, रांजणखळगे, विविध भूआकार व खडकांविषयी माहिती जाणून घेतली. या क्षेत्र भेटीचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी.एम. मारकड, प्रा. गणेश मोढवे यांनी केले. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. एस. बी.पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी प्रोत्साहन दिले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले. वनक्षेत्र भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या वृक्षांची वनस्पतींची माहिती या निमित्ताने मिळाली. त्यामुळे वनक्षेत्राच्या बाबतीत आपल्या ज्ञानामध्ये भर पडल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी यावेळी बोलताना सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांनी वनविहाराचा आनंद घेतला.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले.

५ ते ११ ऑक्टोबर २०१८/२

खेड राजगुरुनगर

# वनौषधींचा विद्यार्थ्यांनी घेतला शोध!

## प्रत्यक्ष अभ्यासाचे प्रयोजन : भूगोल विभागाची भीमाशंकर अभयाराण्यास भेट

राजगुरुनगर, (प्रतिनिधी) - हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरामधील वन औषधी वनस्पतींची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी तसेच तालुक्यातील भूरूपे, वसाहती, शेती, जलप्रणाली यांचा प्रत्यक्ष अभ्यास करावा, भौगोलिक संकल्पना आणि प्रत्यक्ष अनुभव या भेटीतून घेता यावा या उद्देशाने खेड तालुक्यातील चास, कमान, डेहणे, कारकुडी, भीमाशंकर आणि कोंढवळ परिसरात क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. या क्षेत्र भेटीत भूगोल विषयाचा विशेषस्तरावर अभ्यास करणारे सुमारे ४५ विद्यार्थी सहभागी झाले.

आदिवासी लोक आपल्या आजूबाजूला मुबलक प्रमाणात असणाऱ्या हिरडा, बेहडा, सोनकी, बेडकीचा पाला, जंगली आर्द्रक, सफेद कुडा, वेल्या करज, नळकंद, अश्वगंधा, सफेद मुसळी, बारदोळा, हाडसांधी आदी औषधी तसेच काही वनस्पतींचे संकलनही केले. या वनस्पतींची माहिती स्थानिक नागरिक सखाराम बाणेर, सुरेश दाधवड, गणपत वाजे, सुरेश भोजणे यांनी दिली.

याशिवाय या क्षेत्र भेटीत विद्यार्थ्यांनी चासजवळील रांजणखळगे, चासकमान धरण, कळमोडी धरण क्षेत्राला भेट दिली. तसेच कळमोडी धरणाजवळील एकलहरे गावाजवळील पॉलिहाऊसला भेट दिली. सह्याद्री पर्वताच्या घाटमाथ्यावर विविध फुलांचे आणि जैवविविधतेचे निरीक्षण केले. भीमाशंकर जवळील कोकण कडा, कोथळागड आंबेगाव तालुक्यातील घोड नदीवरील कोंढवळ येथील धबधबा, घळई, रांजणखळगे, विविध भू-आकार व खडकांविषयी माहिती जाणून घेतली.

या क्षेत्र भेटीचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. गणेश मोढवे यांनी केले. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी प्रोत्साहन दिले.

### विद्यार्थ्यांनी घेतली जैव विविधततेच्या रक्षणाची शपथ

कमान : [illegible] विद्यार्थ्यांनी जैव विविधतेच्या रक्षणाची शपथ घेतली. [illegible] मार्गदर्शन केले. वन विभाग राजगुरुनगर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कमान [illegible] उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख